# प्रकरण ८

# कराधान नियम

## मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या जागांचे हस्तांतरण इत्यादींविषयी नोटीस

**१. मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काच्या सर्व हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस देणे.-**

(१) कोणत्याही जागेच्या संबंधात मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अशा जागेसंबंधीच्या किंवा अशा जागेवरील मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात येईल तेव्हा तेव्हा, ज्या व्यक्तीच्या मालकी हक्काचे असे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने आणि ज्या व्यक्तीकडे उक्त मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने, हस्तांतरण संलेख करून देण्यात आल्यानंतर किंवा त्याची नोंदणी करण्यात आली असेल तर, त्याच्या नोंदणीनंतर किंवा कोणताही लेख करून देण्यात आला नसेल तर, अशा रीतीने हस्तांतरण करण्यात आल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास लेखी नोटीस दिली पाहिजे.

(२) वर सांगितल्याप्रमाणे प्रथमतः कर देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती मरण पावल्यास, मयत व्यक्तीच्या मालकी हक्काचे वारस म्हणून किंवा अन्यथा ज्या व्यक्तीकडे हस्तांतरण करण्यात येईल त्या व्यक्तीने मयत व्यक्तीच्या मृत्यूपासून एक वर्षाच्या आत अशा हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस दिली पाहिजे.

**२. नोटिशीचा नमुना [१][आणि मालकी हक्काच्या हस्तांतरणाबाबतची देय फी].-**

(१) नियम १ अन्वये द्यावयाची नोटीस ही, आयुक्त वेळोवेळी जाहीर नोटिशीद्वारे विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात असली पाहिजे आणि तीत उक्त नमुन्यानुसार आवश्यक असलेला सर्व तपशील स्पष्टपणे व बिनचूकपणे नमूद केला पाहिजे.

(२) अशी कोणतीही नोटीस मिळाल्यानंतर, आयुक्तास, त्यास तसे करणे आवश्यक वाटले तर, हस्तांतरण लेख असल्यास, तो हस्तांतरण लेख किंवा [२][*] नोंदणी अधिनियम, १९०८ कलम ५७ अन्वये, मिळवलेली त्याची एक प्रत, किंवा मयत व्यक्तीच्या मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात आले असेल तर, त्या बाबतीत, अशा हस्तांतरणाचा पुरावा असलेला अन्य कोणताही दस्तऐवज हजर करण्याविषयी फर्माविता येईल.

(३) अशी नोटीस, ज्या जागेसंबंधी असेल त्या जागेच्या बाबतीत नोटिशीच्या तारखेस असलेला मालमत्ता कर भरण्यात आला नसेल तर आणि स्थायी समिती नोटीस स्वीकारण्यासाठी वेळोवेळी विहित करील अशी फी भरण्यात आली नसेल तर, अशी कोणतीही नोटीस कायदेशीररीत्या देण्यात आली आहे असे मानले जाणार नाही.